'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
ISSN :2348-7143 (Online)
मराठी भाषा आणि साहित्य विशेषांक Vol. 3 Issue. 3 July-Sept.- 2016

# संत तुकोबांची अलंकारसृष्टी

**प्रा. डॉ. सौ. मंगल डोंगरे**
**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,**
**नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे.**
**मो.९७६६४७८१२३**

*तुकोबांनी शब्द इतक्या सामर्थ्याने आणि चमत्कृतीपूर्ण रितीने वापरले आहेत की, त्यातून अनेक अर्थांची वलये ध्वनीत होतात. त्यामुळे भक्ती रसाबरोबरच वत्सल, करूणा, आनंद, वीर, हास्य या रसांचाही उत्कटपणे आविष्कार झाला आहे. यमक, अनुप्रासाबरोबरच उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, दृष्टांत, अनन्वय, स्वभावोक्ती, उत्प्रेक्षा, श्लेष, व्यतिरेक, विरोध, सम, विषम, व्याजोक्ती असे अनेक अलंकार दिसून आले आहेत. तुकोबांच्या काव्यातील नेमकेपणा, विविध अर्थांच्या छटा निर्माण करणारे शब्द, प्रतिके, प्रतिमा, उपमेय, उपमा, रूपके, ध्वनी, वक्रोक्ती, औचित्य, रस यामध्ये वैचारिकता आणि भावनात्मकता व्यक्त होऊन आशय मनावर सामर्थ्याने ठसतो.*

तुकोबांची प्रतिमासृष्टी बहुआयामी असल्यामुळे त्यांच्या काव्यरचनेत अनेक अलंकार स्वाभाविकपणे आले आहेत. काव्याची भाषा असूनही ही कधी बोलण्याचा स्वर सोडीत नाही. तसेच नव्या नव्या अर्थाचे पदर या काव्यातून उलगडत जाताना दिसतात. तुकोबांच्या काव्यात शब्दालंकार व अर्थालंकारात यमक, अनुप्रास, श्लेष आणि उपमा, रूपक दृष्टांत हे अलंकार प्राधान्यक्रमाने दिसतात. दृष्टांत हा अलंकार अत्यंत स्वाभाविक आणि नैसर्गिकरित्याच कवितेत समाविष्ट झाला आहे. या अलंकारसृष्टीतील शब्दशक्ती आणि रस या काव्यगुणांनी कविता अधिक आशयघन झाली आहे.

**शब्दालंकार**

गद्यातील किंवा पद्यातील विशिष्ट शब्दरचनेमुळे वाचकाला आनंद होतो अशा शब्दरचनेला शब्दालंकार म्हणतात. मनातील भाव व्यक्त करताना त्या भावास अनुकूल असा नाद असलेल्या व त्या भावातील छटान्छटा समर्पकपणे व्यक्त करू शकणाऱ्या आणि साभिप्राय अशा शब्दांची निवड करून, अर्थ कळण्यास सोपे जाईल अशी प्रसन्न आणि सुश्लिष्ट शब्दरचना शब्दालंकारात असते.

**अर्थालंकार**

ज्यामुळे रचनेतील अर्थाला शोभा येते, त्या गुणधर्माला अर्थालंकार असे म्हणतात. शब्दाच्या अर्थाच्या शक्तीत बदल झाला म्हणजे अर्थालंकार निर्माण होतात. अर्थालंकारामुळे काव्यातील अर्थ खुलतो व अर्थाला सौंदर्य प्राप्त होते. तुकारामांच्या काव्यात असे अनेक शब्दालंकार व अर्थालंकार आले आहेत.

**शब्दालंकार**

**अनुप्रास अलंकार :** एक किंवा अनेक व्यंजने फिरून लगेच योजणे, पुनरावृत्ती करणे म्हणजे अनुप्रास होय. तुकोबांच्या कवितेतील रचनेचा प्रभाव हा शब्दालंकाराच्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे अधिक प्रभावी ठरतो. त्यांच्या काव्यातील प्रासयुक्त रचना ही केवळ शब्दनिष्ठच नाही तर त्यातून लय, ताल, ठेका, नाद अशा अनुभूतीचा प्रत्यय होतो. उदा.

वाटुली पाहतां सिणले डोळुले। दाविसी पाउले कइं वो डोळा।।
तूं माय माऊली कृपेची साउली। विठ्ठले पाहिली वाटे तुझी।।८०१।।

वाटुली, डोळुले, माऊली, साऊली यात 'उ' कराची व 'ली' या वर्णाची पुनरावृत्ती झाली आहे. नादमय शब्दांमुळे ही काव्यरचना प्रासादिक झाली आहे.

**यमक अलंकार :** दोन किंवा अधिक चरणांच्या शेवटी काही अक्षरांची पुनरावृत्ती होणे याला यमक अलंकार म्हणतात. हे यमक कधी चरणाच्या शेवटी येते, कधी मधे येते, चरणांच्या प्रारंभी तर चरणाच्या शेवटीही येते. प्रासा प्रमाणेच यमक हे नादतत्त्वाचे एक प्रमुख अंग आहे. अंत्य यमक ठळकपणे सर्वत्र आढळते.

**पुनरूक्तवदाभास :** भिन्नाकार शब्द भिन्नार्थक असूनही अर्थाची पुनरूक्ती होते आहे की काय असा भास होतो. तेथे पुनरूक्तवदाभास अलंकार होतो.

आम्हा घरी धन शब्दाचिच रत्न। शब्दाचिच शस्त्रे यत्न करू।।
शब्दचि आमुच्या जीवांचे जीवन। शब्दे वाटू धन जनलोका।।
तुका म्हणे पाहा शब्द चि हा देव। शब्देचि गौरव पुजा करू।।३३८५।।

तुकोबांच्या या काव्यात 'शब्द' हा शब्दप्रयोग सहा वेळा आला आहे. पण प्रत्येक वेळी तो भिन्न अर्थाने वापरला असून, त्यातून वेगवेगळा अर्थ प्रतित झाला आहे. शब्द-धन, शब्द-शस्त्र, शब्द-जीवाचे जीवन, शब्द-जनलोक, शब्द्रदेव, शब्द-गौरव. एकच शब्द भिन्न अर्थाने वापरून तुकोबांनी आपल्या बौद्धिक सामर्थ्याची चमक दाखविली आहे.

**उभयांलंकार श्लेष :** एकच शब्द वाक्यात दोन अर्थाने वापरल्यामुळे जेव्हा शब्दचमत्कृती साधते, तेव्हा 'श्लेष' अलंकार होतो. श्लेष अलंकाराचे शब्दश्लेष व अर्थश्लेष असे दोन प्रकार वर्णिले आहे. कारण एका शब्दातून अनेक अर्थ निघणे किंवा समान उच्चार असलेले एकाहून अधिक शब्द अनेकार्थी योजणे, यास श्लेष म्हणावे. तसेच या अलंकाराला उभयालंकार असेही म्हणतात.

श्लेष अलंकारातील शब्द दोन्ही भावांशी प्रामाणिक असतात.
पतिव्रतेची कीर्ती बाखाणितां। सिंदळईच्या माथां तिडिक उठे।।
आमुचे हे आहे सहज बोलणे। नाही विचारून केले कोणी।।
अंगे उणे त्याच्या बैसे टाळक्यांत। तेणे ठिणग्या बहुत गाळीतसे।।
तुका म्हणे आम्ही काय करणे त्यासी। ढका खबंदासी लागतसे।।।४२२५।।
या काव्यात खवंद या शब्दावर अर्थश्लेष आहे.
१. खवंद : सरकार, महाराज
२. खवंद : क्षत चिघळलेली जखम

स्पष्ट बोलण्यामुळे, चांगल्याचे गुण गायल्यामुळे दुष्टांना राग येतो. दुष्टांना आपल्या उणिवा कळतात त्याला आम्ही तरी काय करणार? आम्ही सहजपणे बोलतो त्याचे असेही काही परिणाम होतात. अत्यंत स्पष्ट शब्दात आणि परिणामकारक असा हा खवंद शब्दाने दोन अर्थ सुचित होतात.

**अर्थालंकार -**

**उपमा अलंकार :** जेव्हा एखादी गोष्ट दुसरीशी गुण व आकृती यांच्या सादृश्याने उपमित केली जाते, तेव्हा 'उपमा' अलंकार होतो. उपमा हा सर्वात जुना अलंकार असून, त्याची उदाहरणे वेदांतातही आढळतात. उपमेय व उपमान ह्यातील साधर्म्य चमत्कृतिपूर्ण रितीने वर्णन केले असता त्या ठिकाणी उपमा अलंकार होतो.

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

उपमेय : ज्याचे वर्णन करावयाचे ती वस्तू किंवा क्रिया.

उपमान : ज्याची उपमा द्यावयाची ती प्रतिमात्मक वस्तू, पदार्थ किंवा क्रिया.

तुकोबा हे संत, कवी, किर्तनकार, प्रबोधनकार होते. आपल्या काव्यातून त्यांनी उपमानाची एवढी पखरण केली की, त्याला मराठी काव्यक्षेत्रात तोड नाही, असे उत्तम खरात यांनी 'तुकारामांचे भावविश्व, खंड ३' या ग्रंथात या अर्थाचे उद्‌गार काढले आहेत. त्यांनी उपमा अलंकाराची उदाहरणे दिली आहेत.

साकरेच्या गोण्या बैलाचिये पाठी। तयासी सेवटी करबाडे।।
मालाचे पै पेटे वाहाताती उंटे। तयालागी कांटे भक्षावया।।३०६०।।

समाजातील काही बापडी माणसे बैल आणि उंटाप्रमाणे राबत असतात, शेवटी या संसारात कितीही कष्ट केले तरी निरर्थक आहे, याची जाणीव तुकोबांनी करून दिली आहे. साखरेचा गोडवा किंवा पेटीतील माल आपल्याला मिळत नाही तर काटेच सहन करावे लागतात. बैल आणि उंटाच्या या अवस्थेप्रमाणे सामान्य माणसांची अवस्था होते, असे या उपमेतून तुकोबांना सूचित करायचे आहे.

**उत्प्रेक्षा अलंकार :** प्रस्तुताच्या ठायी अप्रस्तुताची संभावना करणे यास उत्प्रेक्षा अलंकार म्हणतात. या अलंकारात उपमेयाच्या प्रस्तुताच्या मूळ स्वरूपाविषयीच शंका असते, म्हणजे मुळातच ती वस्तू तशी नसून दुसरीच आहे असा दाट संशय असतो. असंभवनीयाची संभवनीय म्हणून केलेली कल्पना, असा 'उत्प्रेक्षा' या शब्दाचा अर्थ करता येईल.

उत्प्रेक्षातील संभावना जणू, वाटे, भासे, गमे या शब्दांनी होते. तुकोबांच्या काव्यात उत्प्रेक्षा अलंकार काही प्रमाणात आढळतो त्याची उदाहरणे-

आधिल्या भ्रतारे काम नव्हे पुरा। म्हणोनि व्यभिचारा टेकलिये।।
रात्रंदिस मज पाहिजे जवळी। क्षण त्यानिराळी न गमे घडी।।०८।।

तुकोबांच्या या काव्यात दुहेरी अनुभवाची रूपकात्मक रचना आहे. आधिल्या पतीकडून कामभावना पूर्ण होत नाही, म्हणून आपण व्याभिचार करीत आहोत. या स्वैर स्त्रीच्या रूपकातून आपण परमेश्वराशी इतके रममाण झालो आहोत.

**दृष्टांत अलंकार :** उपमेय वाक्याला उपमान वाक्यामध्ये सामान्य धर्मासकट प्रतिबिंबवणे यास दृष्टांत अलंकार म्हणतात. एका वाक्यात जे काही म्हटले आहे त्याचे सादृश्याने दुसऱ्या वाक्यात प्रतिबिंबन करून पृष्टी देणे हा त्यात हेतू असतो.

तुकोबांनी आपल्या विषय प्रतिपादनासाठी अनेक दृष्टांत दिले आहेत. दृष्टांताचा अत्यंत सक्षम आणि लोकाश्रयी वापर करणारे तुकोबा दृष्टांत कवी म्हणून सर्वमान्य आहेत. खरे तर त्यांच्या काव्यात आलेले अलंकरण हा त्यांच्या सामाजिक आणि पारमार्थिक अनुभवाचाच एक अनिवार्य भाग आहे.

रवि रश्मिकळा। नये काढितां निराळा। तैसा आम्हां जाला भाव।।
अंगी जडोनि ठेला देव। गोडी साकरेपासुनी। कैसी निवडती दोन्ही।।५७७।।

परमेश्वराशी एकरून झाल्याचा भाव तुकोबांनी अत्यंत समर्पक दृष्टांतातून व्यक्त झाला आहे. सूर्य आणि त्याचे तेज, साखर आणि तिची गोडी यांची जशी वेगळीक होत नाही त्याप्रमाणे परमेश्वराशी आपण एकरूप झालो आहोत.

**रूपक अलंकार :** प्रस्तुतावर केलेले अप्रस्तुताच्या आरोपाने प्रस्तुत झाकले गेले नसल्यास रूपक अलंकार होतो.

तुकोबांच्या कवितेत रूपकांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे आशयाला खूप मोठा अवकाश प्राप्त होतो. उपमेय आणि उपमान तर तुकोबांच्या कवितेत एकरूप होतातच, शिवाय रूपकांचा मोठा विस्तार तुकोबा विषयाच्या प्रतिपादनासाठी करतात. रूपकांच्या माध्यमातून अनेकविध अर्थ व्यक्त करण्याची तुकोबाची क्षमता अफाट आहे. या रूपकात्मकतेमुळे काव्यसौंदर्यात भर पडली असून भक्तीरसाच्या रूपकात्मतेचे असंख्य झरे तुकोबांच्या गाथेत वाहताना दिसतात.

आनंदाचे डोही आनंद तरंग। आनंद चि अंग आनंदाचे।।
काय सांगो जाले कांहीचियाबाही। पुढे चाली नाही आवडीने।।
गर्भाचे आवडी मातेचा डोहाळा। तेथीचा जिव्हाळा तेथे बिंबे।।
तुका म्हणजे तैसा ओतलासे ठसा। अनुभव सारिसा मुखा आला।।३२४१।।

तुकोबांचा आत्मसाक्षात्कार अत्यंत आनंददायक आहे. आनंदाच्या डोहात निघणारे आनंदाचे तरंग, गर्भाच्या आवडीनुसार आईला लागलेले डोहाळे, अशी समर्पक रूपके देऊन आपली अलौकिक आनंदमय अवस्था तितक्याच समर्पक रूपकातून व्यक्त झाली आहे.

**तद्गुण अलंकार :** दोन वस्तूंपैकी, दुसरीशी असमान गुण असणाऱ्या एका वस्तुने, दुसऱ्या वस्तुचे तिच्या ठिकाणी असणाऱ्या गुणातिशयामुळे गुणग्रहण करणे यास तद्गुण अलंकार म्हणतात. तुकोबांच्या काव्यातील तद्गुण अलंकाराची उदाहरणे-

ढेकणाच्या संगे हिरा जो भंगला। कुसंगे नाडला तैसा साधु।।
ओढाळाच्या संगे सात्विक नासली। क्षण एक नाडली समागमे।।
डाका. चे संगती सोने हीन जाले। मोल ते तुटले लक्ष कोडी।।
विषाने पक्वान्ने गोड कडू जाली। कुसंगाने केली तैसी परी।।
भावे तुका म्हणे सत्संग हा बरा। कुसंगे हा फेरा चौऱ्यांशीचा।।३४०३।।

तुबोकांनी आपल्या उपदेशपर अभंगातून समाजाला नीतीचा उपदेश केला. कोणाच्या सहवासात गेल्यावर अध:पतन होते, याचे उत्कृष्ट विवेचन करताना तुकोबा म्हणतात, ढेकणाच्या सहवासात हिरा, दुर्जनांच्या सहवासात साधू, ओढाळ स्त्रीच्या सहवासात पतिव्रता, चोराच्या सहवासात सोने, पक्वान्नाच्या सहवासात विष, यांच्या कुसंगाने चांगल्या मौल्यवान गोष्टींचा नाश होतो. या दृष्टांतातून कुसंग वाईट आहे, म्हणून सत्संग धरला पाहिजे. आपले म्हणणे लोकांच्या मनावर ठसवण्यासाठी तुकोबा अतिशय सुंदर उदाहरणे देतात.

**विषम अलंकार :** विषम म्हणजे समता नसणे. जेव्हा कार्याच्या व कारणाच्या गुणात विरोध असतो, तेव्हा विषम अलंकार होतो. विषम अलंकार अनेक रितीने होऊ शकतो.

मऊ मेनाहूनि आम्ही विष्णुदास। कठिण वज्रास भेदूं ऐसे।।
मेले जित असो निजोनिया जागे। जो जो जो जे मागे ते ते देऊं।।

भावनाशील वैष्णव हे मऊ असले तरी सर्वांशी ते सारखे वागणार नाहीत. कारण समाजात जशी माणसे भेटतील, त्याप्रमाणे वागावे लागते. जे चांगले त्यांना नेसलेली लंगोटीसुद्धा देऊन आणि नाठाळपणा करणाऱ्यांच्या डोक्यात काठी घालू. आम्ही आईबापापेक्षा मायाळू आणि शत्रूपेक्षा ही जास्त घातपात करणारे

आहोत. अमृतापेक्षा गोड आणि प्रसंगी विषापेक्षा कडू आहोत असे आम्ही गोडच आहोत. दुष्टांना वठणीवर आणण्याचा गुण आणि सज्जनांशी सज्जनांप्रमाणे वागण्याचा गुण दोन्ही आमच्यामध्ये आहेत.

**सम अलंकार :** सम म्हणजे योग्य गोष्ट घडणे, कारणानुरूप कार्य घडणे. त्या वस्तुचे गुण दुसऱ्या वस्तूत संसर्ग होणे, योग्य गोष्टीशी तद्नुरूप गोष्टींचा तद्नुरूप गोष्टींचा संसर्ग होणे. अशी सम अलंकाराची व्याख्या करून मम्मटाने त्याचे दोन भेद केले.

१. चांगल्या गोष्टींचा योग येणे, २. वाईट गोष्टींचा योग येणे.

सम अलंकाराची काही उदाहरणे तुकोबांच्या काव्यात आढळली ती पुढीलप्रमाणे-

शुद्धाशुद्ध निवडे कैसे। चर्म मास भिन्न नाही।।
काही अधिक नाही उणे। कवण्या गुणे देवासी।।
उदक भिन्न असे काई। वाहाळ बाबी सरिता नई।।
वर्णा भिन्न दुधा नाही। सकळा गाई सारखे।।
करितां भिन्न नाही माती। मडक्या गति भिन्न नांवे।।
वर्ते एकविध अग्नि। नाही मनी शुद्धाशुद्ध।।३४५१।।

परमेश्वराजवळ विषम भाव नाही, हे सांगण्यासाठी तुकोबांनी सम अलंकाराची अनेक उदाहरणे दिली आहेत. पाणी ओढ्यात असो, विहिरीत असो, नदीत असो किंवा झऱ्यातील असो त्यात समानता असते. सर्वच गायांच्या दुधात समानता असते. सर्वच मडक्यांची माती एकच असते. अग्नीमध्येही भिन्नता नसते. मन हे शुद्ध अशुद्ध असे नसते. सर्वांचे मन शुद्ध असते. परमेश्वराविषयी समत्व भाव दर्शविणारी अनेक उदाहरणे तुकोबा या काव्यातून देतात. परमेश्वरातील समत्व भाव सागरातील पाणी आणि तरंग यांच्या ऐक्याप्रमाणे आहे.

**भ्रांतिमान :** अतिसाम्यामुळे एकाऐवजी दुसरेच भासणे यांस भ्रांतिमान म्हणावे.

माया तेचि ब्रह्म तेचि माया। अंग आणि छाया तयापरी।।६५।।

अंग आणि छाया जशी वेगळी करता येत नाही, त्याप्रमाणे माया हेच ब्रह्म आणिब्रह्म हेच माया असा भाव निर्माण होतो.

**पर्यायोक्ती :** जे काही सांगायचे ते सरळ शब्दात न सांगता, निराळ्या रितीने कळविणे म्हणजे पर्यायोक्ती अलंकार होय.

आपणा लागे काम वाण्याघरी गुळ। त्याचे याति कुळ काय कीजे।।
उकरड्यावरी वाढली तुळशी। टाकावी ते कैसी ठायागुणे।।
गाईचा जो भक्ष अमंगळ खाय। तीचे दूध काय सेवूं नये।।
तुका म्हणे काय सालपटाची काज। फणसांतील वीज काढूनि घ्यावे।।३८५५।।

व्यक्ती किंवा वस्तुतील सद्गुणांचा विचार करावा. हे पर्यायोक्ती अलंकारातून अनेक दृष्टांत देऊन तुकोबा विशद करतात. वाण्याकडचा गूळ घ्यावा त्याची जात कोणती? हे महत्त्वाचे नाही. गायीचे दूध पवित्र आहे ती काय खाते ते महत्त्वाचे नाही. फणसाला काटे असले तरी आतील मधूर गोड गर काढून घ्यावा. जे सत्वयुक्त आहे, उपयुक्त आहे, याचाच विचार व्हावा. असे अत्यंत परखड आणि उत्तमोत्तम उदाहरणाने तुकोबा पटवून देतात.

**अनन्वय :** उपमा ही अलंकाराची जननी आहे. अनन्वय हा अलंकार उपमेतूनच निर्माण झाला आहे. अनन्वय नाही ज्याला तो अनन्वय. एखाद्या गोष्टीशी दुसरे कोणतेही असे दृश्य दाखविण्यासाठी तीच गोष्ट उपमान व उपमेय होते, तेव्हा अनन्वय होतो. तुकोबांना सारे जग हरिरूप वाटते, त्यामुळे त्यांचा ओढा अन्वयात्मक विवेचनाकडे आहे.

जीवाशिवाजे भातुके। केले क्रीडाया कौतुके।।
कैची येथे लोके। हा अभास अनित्य।।३५४।।

**स्मरण :** अप्रस्तुतास पाहून तत्सदृश असलेल्या प्रस्तुताची आठवण होणे यास 'स्मरण' अलंकार म्हणावे.

उपजला प्राणी न राहे संसारी। बैसला शेजारी काळ उसा।।४३२८।।

जन्माला आलेल्या प्रत्येकाला मृत्यू येतो, हा मृत्यू सतत आपल्या जवळपास असतो. ज्याप्रमाणे बोका उंदराला क्षणात घेऊन जातो, खाटिक, कसाई प्राण्यांचा जीव घेतात, त्याप्रमाणे माणसाची स्थिती आहे. तेव्हा वेळ फार महत्त्वाचा असून संसाराच्या फार मोहात पडू नका, असा उपदेश तुकोबा करतात.

**तुल्ययोगिता :** प्रस्तुत किंवा अप्रस्तुत अशा अनेक वस्तुंना, एकाच क्रीयेशी किंवा एकाच गुणाशी जोडणे यास तुल्ययोगिता अलंकार म्हणतात.

महापुरे झाडे जाती। तेथे लव्हाळे राहाती।।१२८७।।

महापुराबरोबर मोठ्या वृक्षांची आणि छोट्या लव्हाळ्यांची तुलना केली आहे. ताठरपणा यामुळे स्वत:चे नुकसान होते आणि नम्रतेमुळे फायदा होतो. हे तत्त्व तुकोबांनी परिणामकारकपणे सांगितले आहे.

**दीपक :** जेव्हा एकाच नामाचा अनेक क्रियापदांशी संबंध असतो तेव्हा 'दीपक' हा अलंकार होतो. किंवा एकच शब्द जेव्हा वाक्यात आदि, मध्ये अथवा अंती राहून संबंध वाक्यार्थावर प्रकाश पाडतो तेव्हा, त्यास 'दीपक' अलंकार म्हणतात. जाति, क्रीया, गुण, द्रव्य यांचा वाचक शब्द एके ठिकाणी राहून अनेक वाक्यार्थांचा संबंध लावील तेव्हा त्याला दीपक अलंकार म्हणतात.

तुकोबांच्या काव्यातील दीपक अलंकाराची उदाहरणे पुढीलप्रमाणे-
कुळधर्म ज्ञान कुळधर्म साधन। कुळधर्मे निधान हाती चढे।।
कुळधर्म भक्ति कुळधर्म गति। कुळधर्म विश्रांति पाववील।।
कुळधर्म दया कुळधर्म उपकार। कुळधर्म सार साधनाचे।।
कुळधर्म महत्त्व कुळधर्म मान। कुळधर्म पावन परलोकीचे।।
तुका म्हणे कुळधर्म दावी देवी देव। यथाविध भावजरी होय।।१०२०।।

कुळधर्म हा दिपक अलंकारासाठी वापरलेला शब्द आहे. ज्याचा जसा भाव असेल तसा त्याला कुळधर्माप्रमाणे परमेश्वर प्राप्त होईल.

**व्याजस्तुती :** तुकोबांच्या काव्यातील व्याजस्तुती अलंकाराची उदाहरणे पुढीलप्रमाणे-

अनंत ब्रह्मांडे उदरी। हरि हा बालक नंदाघरी।।
पृथ्वी जेणे तृप्त केली। त्यासि यशोदा भोजन घाली।।

श्रीकृष्ण परमात्म्याचे वर्णन दोन प्रकारे करून व्याजस्तुती अलंकाराचे उपयोजन तुकोबा करतात. श्रीकृष्णाची स्तुती करताना तुकोबा म्हणतात, अनंत ब्रह्मांडे उदरी तो बालक नंदाघरी, पृथ्वी तृप्त करणाऱ्याला यशोदा जेऊ घालते.

**स्वभावोक्ती :** वस्तुस्थिती जशी असे, तसेच हुबेहूब वर्णन करणे, यास ‘स्वभावोक्ती’ अलंकार म्हणतात. तुकोबांनी आपल्या काव्यातून विविध प्रकारच्या स्वभावाच्या वृत्ती प्रवृत्तीच्या व्यक्ती व प्राण्यांचे वर्णन केलेले आहे. तरी त्यात अध्यात्माचे सूत्र विविध पदरांनी नटलेले आहे. अनादी अनंत ईश्वरतत्त्व सोडून विनाशी संसाराच्या मायेच्या आहारी जाणारे मानवी मनाचे चित्र ते सहजपणे रेखाटतात.

परिसे गे सुनेबाई। नको वेचूं दूध दही।।
आवा चालली पंढरपुरा। वेसीपासुनि आली घरा।।४१९८।।

आवा ही सासू पंढरपूरला जाण्यासाठी निघाली पण संसारातून तिचे मन मुक्त होत नाही. ही सासू म्हणजे संसारात अडकलेल्या माणसांची प्रतिनिधी आहे. तिच्या या स्वभावाचे हुबेहूब चित्रण तुकोबा करतात.

**अतिशयोक्ती :** नेहमी अनुभवात येणाऱ्या गोष्टीचे अगर वर्ण्य विषयाचे वस्तू स्थितीपेक्षा अधिक वर्णन करणे म्हणजे अतिशयोक्ती होय.

निपट मज न चले अन्न। पायली गहू सांजा तीन।।
अखंड मज पोटाची व्यथा। दूधभात साकर तूप पथ्या।।
हाड गळोनि आले मांस। माझे दुःख तुम्हा नेणवे कैसो।।३६।।

प्रपंचातील औचित्यविसंगती सांगण्यासाठी एका बायकोचे गाऱ्हाणे सांगितले आहे. पायलीभर गव्हाचा सांजा आणि साखर, तूप, दूध खाणारी बायको आपल्या प्रकृतीविषयी कूरकूर करते. हाड गळून मांस आले आहे. माझे मला दुःख माहित, असे तिचे उद्गार अतिशयोक्तीचे उत्तम उदाहरण आहे.

**चेतनागुणोक्ती :** निसर्गातील निर्जिव वस्तू सजीव आहेत अशी कल्पना करून ती मनुष्याप्रमाणे वागतात, किंवा कृती करतात असे जेथे वर्णन असते तेथे ‘चेतनागुणोक्ती’ अलंकार होतो.

खेळ मांडियेला वाळवंटी घाई। नाचती वैष्णव भाई रे।।
निर्मल चित्ते जाली नवनिते। पाषाणा पाझर सुटती रे।।१८९।।

पाषाणाला पाझर फुटणे हे चेतनागुणोक्ती अलंकाराचे उत्तम उदाहरण आहे. पंढरपूरच्या वाळवंटात जेव्हा सर्व वैष्णवजण एकत्र येतात, परमेश्वर नामचिंतनात ते इतके तल्लीन होऊन नाचतात की, सर्वांची मने निर्मळ होऊन नवनीताप्रमाणे कोमल, मुलायम होतात. त्या वैष्णवमेळ्यात पाषाणाला पाझर फोडण्याचे सामर्थ्य असते.

**तुकोबांच्या अलंकाराचे विशेष**

**१. अलंकाराची शब्दनिष्ठा :** शब्दाच्या उच्चाराच्या शक्तीत बदल झाला म्हणजे शब्दालंकार निर्माण होतात. त्याचप्रमाणे शब्दांमध्ये तुकोबांनी भावनिक अंश ओतला आहे. त्यांच्या विचारांचे आणि अभिव्यक्तींचे कौशल्य शब्दांमध्ये सामावले आहे.

तुकोबांची प्रतिभाशक्ती, कल्पनाशक्ती, स्फूर्ती, संवेदना, उन्मेष, अनुभवाची व्यापकता यातून त्यांच्या काव्याला नवेनवे धुमारे फुटले आहेत. प्रसंग साक्षात डोळ्यापुढे उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या हृदयस्पर्शी आर्त आणि गोड शब्दात आहे. त्यांच्या शब्दांनी अखंड विश्वालाच कवेत घेतले आहे. त्यांच्यात प्रतिभेला जे दिव्य साक्षात्कार होतात ते सामान्यांच्या आकलनापलिकडचे आहेत. त्याचप्रमाणे शब्दांची निवड औचित्यपूर्ण चपखल असल्यामुळे शब्दांना नादमाधुर्य, गोडवा, लय, ताल, स्वर प्राप्त झाला आहे. त्यामुळे शब्दसौंदर्य आणि अर्थसौंदर्य खुलून आले आहे.

**२. अलंकार आणि अर्थ :** तुकोबांनी शब्द इतक्या सामर्थ्याने आणि चमत्कृतीपूर्ण रितीने वापरले आहेत की, त्यातून अनेक अर्थांची वलये ध्वनीत होतात. त्यामुळे भक्ती रसाबरोबरच वत्सल, करूणा, आनंद, वीर, हास्य या रसांचाही उत्कटपणे आविष्कार झाला आहे. यमक, अनुप्रासाबरोबरच उपमा, उत्प्रेक्षा, रूपक, दृष्टांत, अनन्वय, स्वभावोक्ती, उत्प्रेक्षा, श्लेष, व्यतिरेक, विरोध, सम, विषम, व्याजोक्ती असे अनेक अलंकार दिसून आले आहेत.

तुकोबांची तल्लख कल्पनाशक्ती, तीव्र बुद्धीमत्ता यांचा प्रत्यय या त्यांच्या अलंकारातून येतो. तुकोबांच्या अलंकारिक भाषेत इतका आशय दडला आहे की, त्यांना मंत्रशक्तीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

**३. अलंकाराची आशयनिष्ठा :** तुकोबांच्या काव्यातील नेमकेपणा, विविध अर्थांच्या छटा निर्माण करणारे शब्द, प्रतिके, प्रतिमा, उपमेय, उपमा, रूपके, ध्वनी, वक्रोक्ती, औचित्य, रस यामध्ये वैचारिकता आणि भावनात्मकता व्यक्त होऊन आशय मनावर सामर्थ्याने ठसतो.

तुकोबांच्या पराकोटीच्या भक्तीबरोबर नीती, सदाचार, सामाजिकता, कौटुंबिक जीवन, माणसांमाणसांमधील परस्पर व्यवहार, लोकजीवन, रिती, परंपरा, तत्कालीन प्रश्नांबरोबरच तुकोबांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचा संघर्ष, त्यांच्या सभोवतालचा परिसर, निसर्ग, प्राणी, पक्षी, वनस्पती, शेती, विविध व्यवसाय, उद्योग, देहू, सामान्यजन, संत, त्यांच्या आशयाच्या परिघात आली आहेत.

**४. प्रासादिकता :** प्रासादिकता हा काव्यगुण आहे. यमक आणि अनुप्रास या शब्दालंकाराच्या रचनेमुळे काव्य प्रासादिक झाले आहे. चमत्कृती, चातुर्य, विद्वत्व, कवित्व, संतत्व यांचा सुरेख संगम झाल्यामुळे त्यात प्रासादिकता आली आहे.

**५. भावनानिष्ठा :** तुकोबांच्या विविध भावनांच्या छटा काव्यात प्रतिबिंबित झाल्या आहेत. आपल्या आशय प्रकटीकरणासाठी तुकोबांनी अलंकाराचा खटाटोप केलेला नाही. त्यात स्वाभाविकता प्रत्ययास येते. अनेक प्रसंगी तुकोबांच्या भावनांना कढ आले आहेत आणि त्यातून स्वयंस्फुर्तीने अलंकार उफाळून आले आहेत. सृष्टीतील मानवी भावनांचे प्रतिध्वनी तुकोबांच्या हृदयात उमटतात आणि त्याचे प्रतिध्वनी वाचकांच्या हृदयाला जाऊन भिडतात. असे त्यांचे काव्य झंकारत राहते, वाचक तुकोबांशी एकरूप होऊन जातो.

**६. अल्पाक्षरत्व :** आत्मानुभावी पुरूषांची वचने सिद्धांतरूप असतात म्हणूनच, ती सामान्यांच्या हृदयाशी जाऊन भिडतात. चिरंतन सत्याचे अधिष्ठान असलेले तुकोबांचे काव्य सर्वतोमुखी होऊन मराठी भाषेला वैभव आणि सामर्थ्य प्राप्त झाले आहे. अल्पाक्षररमणीयत्वामुळे तुकोबांचे विचार जनमानसात स्थिर होतात.

तुकोबांच्या भावोर्मी मनाच्या गाभ्यातून उसळून येतात, त्या अल्पाक्षरी आणि आशयघन होतात आणि त्यामुळे भाषा वैश्विक सत्ये आणि शाश्वत मूल्ये देणारी झाली आहेत. तुकोबांच्या काव्यातील अलंकारामुळे मंत्रशक्ती महाकाव्य आणि जीवनभाष्य यांना अल्पाक्षरत्व प्राप्त झाले आहे.

**संदर्भग्रंथ –**

१. सानप किशोर, समग्र तुकाराम दर्शन, विजय प्रकाशन, नागपूर, प्र.आ., २००८, पृ.५६२.
२. जोशी महादेव, सुलभ काव्यशास्त्र, दत्तात्रय गाणू प्रकाशन, पुणे, च.आ., २००१, पृ.१३.
३. काळेले रा. अ., नवे अलंकार, मनोहर ग्रंथालय प्रकाशन, पुणे, द्वि.आ., १९६३, पृ.१३.
४. खरात उत्तम, तुकारामांचे भावविश्व, खंड २, ३, वैष्णवी प्रकाशन, बुलढाणा, प्र.आ., २००३, पृ.५४–१६०.

५. पाटील स. सु., संत तुकाराम अंतर्बाह्य संघर्षाची अनुभवरूपे, शब्दाली प्रकाशन, मुंबई, २००४, पृ.१०५–२३०.
६. पेंडसे शं. दा., साक्षात्कारी संत तुकाराम, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजायनगर, पुणे, प्र.आ., १९९८, पृ.३.
७. घोंगडे दिलीप, शैलीमिमांसा, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ., २००१, पृ.५२–५७.
८. वाटवे के. ना., रसविमर्श, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वि.आ., १९६१, पृ.२८४.
९. धोंडगे रमेश, शैलीवैज्ञानिक समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९९६, पृ.५३–५७.
१०. इनामदार हे. वि., अनुभव तुकोबाचा, स्नेहल प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९९४, पृ.१२१, १२२, १८७.